**वसई विरार शहर महानगरपालिका**

**वैद्यकीय आरोग्य विभाग**

**दि.२७/०३/२०२६**

## प्रेसनोट

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील देविपाडा, आंबोवाडी, खंडिपाडा, घरतपाडा, एच.डी. आय.एल. इंडस्ट्रियल परिसराच्या मागील भाग, भाटपाडा तसेच चंदनसार (विरार पूर्व) या भागांमध्ये पिसाळलेल्या (संशयित) श्वानाच्या वावराबाबत माहिती मा. महापौर यांना प्राप्त झाली होती. सदर माहिती मिळताच मा. महापौर साहेबांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य विभागाने तातडीने कार्यवाही करत संबंधित परिसरात विशेष पथक पाठविण्यात आले. या पथकात श्वान बचाव पथकाची नेमणूक करून पिसाळलेल्या श्वानाचा शोध घेऊन श्वानास हटविण्यात आले. ज्या ३ व्यक्तींना श्वानाने चावा घेतल्याचे कळले त्यांना वैद्यकीय आरोग्य विभागाच्या पथकामार्फत इंजेक्शन एआरव्ही देण्यात आले. तसेच देवीपाडा या कार्यक्षेत्रातील ज्या श्वानांना पिसाळलेला श्वानाने चावा घेतला आहे, अशा १२ श्वानांना पकडून त्यांना रिंग लस देऊन श्वानांचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी श्वान निवारा केंद्र येथे नेण्यात आले.

सर्व बाधित नागरिकांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना आवश्यक ती उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच संबंधित परिसरात वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत घरोघरी सर्वेक्षण मोहीम राबविण्यात आली. या सर्वेक्षणादरम्यान कोणत्याही व्यक्तीस श्वानाने चावा लागल्याची किंवा संशयित लक्षणे आढळल्यास तात्काळ उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

आरोग्य विभाग

वसई विरार शहर महानगरपालिका